# Regional Marathi Text Bulletin, Chhatrapati Sambhajinagar

Date – 05 December 2024

Time 18.10 to 18.20

Language Marathi

**आकाशवाणी छत्रपती संभाजीनगर**

**प्रादेशिक बातम्या**

**दिनांक – ०५ डिसेंबर २०२४ सायंकाळी ६.१०**

****

- राज्याचे २१ वे मुख्यमंत्री म्हणून देवेंद्र फडणवीस यांचं शपथग्रहण–एकनाथ शिंदे आणि अजित पवार यांना उपमुख्यमंत्रिपदाची शपथ
- पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्यासह अनेक मान्यवरांच्या उपस्थितीत शपथग्रहण सोहळा साजरा
- भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या अडुसष्टाव्या महापरिनिर्वाण दिनासाठी मुंबई महापालिका सज्ज

आणि

- फिडे जागतिक बुद्धीबळ स्पर्धेत भारताचा डी. गुकेश आणि चीनच्या डिंग लेरेन यांच्यातली आठवी फेरीही अनिर्णित

****

राज्याचे २१ वे मुख्यमंत्री म्हणून देवेंद्र फडणवीस यांनी आज शपथ घेतली. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या उपस्थितीत मुंबईत आझाद मैदानावर झालेल्या या शपथग्रहण सोहळ्यात राज्यपाल सी पी राधाकृष्णन यांनी त्यांना पद आणि गोपनीयतेची शपथ दिली..

***बाईट – देवेंद्र फडणवीस***

यावेळी माजी मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी उपमुख्यमंत्री म्हणून शपथ घेतली. देवेंद्र फडणवीस यांच्यापाठोपाठ उपमुख्यमंत्रिपदाची शपथ घेणारे ते दुसरे माजी मुख्यमंत्री ठरले.

**बाईट – एकनाथ शिंदे**

माजी उपमुख्यमंत्री अजित पवार यांनीही आज उपमुख्यमंत्री पदाची शपथ घेतली, ते सहाव्यांदा राज्याच्या उपमुख्यमंत्रिपदावर विराजमान झाले आहेत.

**बाईट – अजित पवार**

या सोहळ्याला केंद्रीय मंत्रिमंडळातले मान्यवर सदस्य अमित शहा, जे पी नड्डा, राजनाथसिंह, नितीन गडकरी, अश्विनी वैष्णव, पियुष गोयल, निर्मला सीतारामन, शिवराजसिंह चौहान, ज्योतिरादित्य शिंदे, रक्षा खडसे, मुरलीधर मोहोळ, रामदास आठवले, उत्तरप्रदेशचे मुख्यमंत्री योगी आदित्यनाथ, बिहारचे मुख्यमंत्री नीतीशकुमार, गुजराथचे मुख्यमंत्री भुपेंद्र पटेल, मध्यप्रदेशचे मुख्यमंत्री मोहन यादव, छत्तीसगडचे मुख्यमंत्री विष्णुदेव साय, आसामचे मुख्यमंत्री हेमंत बिस्वशर्मा, उत्तराखंडचे मुख्यमंत्री पुष्करसिंह धामी, गोव्याचे मुख्यमंत्री प्रमोद सावंत, आंध्रप्रदेशचे मुख्यमंत्री चंद्रबाबू नायडू तसंच उपमुख्यमंत्री पवन कल्याण, यांच्यासह अनेक राज्यांचे मुख्यमंत्री, विविध राजकीय पक्षांचे नेते, अंबानी कुटुंबीयांसह अनेक उद्योजक, अभिनेत्री माधुरी दीक्षितसह सिनेसृष्टीतले कलावंत, आणि क्रिकेटपटू भारतरत्न सचिन तेंडुलकर यांच्यासह अनेक क्षेत्रातले मान्यवर या शपथग्रहण सोहळ्याला उपस्थित होते. प्रसिद्ध गायक संगीतकार अजय अतुल यांच्या गायनासह विविध सांस्कृतिक कार्यक्रम यावेळी सादर झाले.

****

भारतीय विमान विधेयक २०२४ वर आज राज्यसभेत पुन्हा चर्चा सुरू झाली. लोकसभेने हे विधेयक आधीच मंजूर केले आहे. हे विधेयक केंद्र सरकारला कोणत्याही विमानाचा आराखडा, उत्पादन, देखभाल, विक्री, निर्यात किंवा आयात यांचे नियमन करण्याचे आणि विमानाच्या कार्यान्वयनाच्या सुरक्षेचे नियम निर्धारित करण्याचा अधिकार देते. विमान वाहतूक क्षेत्रात बरीच प्रगती झाल्याचं भारतीय जनता पक्षाचे शंभू शरण यांनी यासंदर्भातल्या चर्चेत सहभागी होताना सांगितलं. गेल्या दहा वर्षांत देशांतर्गत हवाई प्रवाशांची संख्या दुपटीने वाढली असल्याचं शरण यांनी नमूद केलं.

देशभरात १५७ विमानतळ कार्यरत असल्याची माहिती, नागरी विमान वाहतूक मंत्री किंजरापू राम मोहन नायडू यांनी दिली. लोकसभेत ते आज पुरवणी प्रश्नाला उत्तर देताना बोलत होते. केंद्र सरकारने देशभरात विमानतळाचं जाळं विस्तारलं असून,

देशांतर्गत हवाई वाहतुकीने एकाच दिवसात पाच लाखांहून अधिक प्रवाशांचा टप्पा गाठला असल्याचं, नायडू यांनी सांगितलं.

****

अदानी लाचखोरी प्रकरणी आज संसदेच्या परिसरात विरोधी पक्षांनी जोरदार निदर्शने केली. विरोधी पक्ष नेता काँग्रेस खासदार राहुल गांधी यांच्यासह राजद, डीएमके आदी प्रमुख विरोधी पक्षांनी निदर्शनं केली या प्रकरणाची संसदेच्या संयुक्त समितीतर्फे चौकशी करण्याची मागणी यावेळी विरोधकांनी केली.

परदेशातून देशहितावर होत असलेल्या हल्ल्यांचा मुद्दा भाजपा खासदार सुधांशु त्रिवेदी यांनी राज्यसभेत शून्य प्रहरात उपस्थित केला. त्यावर सभापती जगदीप धनखड यांनी हा गंभीर मुद्दा असल्याचं सांगत त्यावर अधिक वेळ चर्चा करण्याची सूचना केली. त्यावर विरोधी पक्षाच्या खासदारांनी जोरदार आक्षेप घेतला. त्यानंतर झालेल्या गोंधळात राज्यसभेचं कामकाज १२ वाजेपर्यंत तहकूब करण्यात आलं. त्यानंतर पुन्हा कामकाजाला सुरुवात झाली.

****

भारतीय रिझर्व्ह बँकेचं वित्त धोरण उद्या जाहीर होणार आहे. बँकेनं फेब्रुवारी २०२३ पासून रेपो दरात कोणताही बदल केलेला नसून, तो सहा पूर्णांक पाच टक्क्यांवर स्थिर राखला आहे. दरम्यान, रिझर्व्ह बँकेनं युपीआय लाइटची मर्यादा ५०० रुपयांवरुन एक हजार रुपये केली आहे. मात्र, एकंदर मर्यादा पाच हजार असल्याचं बँकेनं जारी केलेल्या अधिसूचनेत म्हटलं आहे. या नवीन मर्यादा तत्काळ प्रभावाने लागू करण्यात आल्या आहेत.

****

भारतीय अंतराळ संशोधन संस्था इस्रोने आज श्रीहरिकोटा इथं सतीश धवन अंतराळ केंद्रात PROBA तीन अंतराळयान घेऊन जाणारे PSLV C एकोणसाठचे यशस्वी प्रक्षेपण केले. PROBA 3 हे युरोपियन स्पेस एजन्सीचे इन ऑर्बिट प्रात्यक्षिक मिशन आहे. हे मिशन अचूक उपग्रह स्थिती, निर्मिती उडाणे, अधिग्रहण आणि समीपता ऑपरेशन्ससाठी नवीन तंत्रज्ञान प्रदर्शित करेल.

****

भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या अडुसष्टाव्या महापरिनिर्वाण दिनानिमित्त राज्यभरातून येणाऱ्या अनुयायांसाठी मुंबईत चैत्यभूमीवर महापालिकेने पायाभूत सुविधा केल्या आहेत. पालिकेकडून नियंत्रण कक्ष, रुग्णवाहिका, आरोग्य सेवा,

पिण्याच्या पाण्याची व्यवस्था, शौचालये आदी सोयी-सुविधा उपलब्ध करून देण्यात आल्या आहेत. चैत्यभूमी परिसरात लावलेल्या एलईडी स्क्रीनवर थेट प्रक्षेपण केलं जाणार आहे.

दरम्यान, छत्रपती संभाजीनगर इथं डॉ बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ प्रवेशद्वार परिसरात असलेल्या बाबासाहेबांच्या पुतळ्याला नागरिकांनी अभिवादन करण्याचं आवाहन महापालिकेकडून करण्यात आलं आहे.

****

छाया-प्रकाश फाऊंडेशनचे यंदाचे पुरस्कार जाहीर झाले आहेत. अभिनेते भरत दाभोळकर, ज्येष्ठ पत्रकार कुमार केतकर, अभिनेते किशोर कदम आणि युवा चित्रकार सिद्धार्थ शिंगाडे यांना यंदा या पुरस्कारानं गौरवण्यात येणार आहे. येत्या २१ डिसेंबरला सोलापुरात मॅगसेसे पुरस्कार विजेत्या सामाजिक कार्यकर्त्या अरुणा रॉय यांच्या हस्ते पुरस्कार प्रदान सोहळा होणार आहे. एक लाख रूपये रोख आणि मानपत्र असं पुरस्कारांचं स्वरूप आहे. याच कार्यक्रमात दोन शिक्षकांचा गौरव आणि २९ गुणवान विद्यार्थ्यांना ८ लाख रुपये इतक्या रकमेची शिष्यवृत्ती देण्यात येणार आहे, अशी माहिती फाऊंडेशनचे अध्यक्ष आणि दिल्ली हायकोर्टाचे निवृत्त मुख्य न्यायमूर्ती अजित शहा यांनी दिली.

****

सिंगापूर इथं सुरु असलेल्या, यंदाच्या फिडे जागतिक बुद्धीबळ स्पर्धेत, भारताच्या डी. गुकेश आणि चीनच्या डिंग लेरेन यांच्यातली आठवी फेरीही अनिर्णित राहिली. दोघांनाही प्रत्येकी ४ गुण मिळाले असून त्यांच्यातील अनिर्णित राहिलेली ही सलग पाचवी फेरी आहे. त्यांनी आतापर्यंत एक एक गेम जिंकला असून त्यांचे ६ गेम अनिर्णित राहिले आहेत. या स्पर्धेचं अजिंक्यपद जिंकण्यासाठी दोघांनाही प्रत्येकी ३ पूर्णांक ५ दशांश गुणांची आवश्यकता आहे.

****

भारत आणि ऑस्ट्रेलियादरम्यान सुरु असलेल्या बॉर्डर-गावस्कर चषक कसोटी क्रिकेट मालिकेतला दुसरा सामना उद्यापासून ॲडलेड इथं खेळला जाणार आहे. पहिला सामना जिंकून भारत मालिकेत एक - शून्यनं आघाडीवर आहे.

****

छत्रपती संभाजी नगर महानगरपालिकेचे ०४ विद्यार्थी युरोप खंडातील एस्टोनिया या शहरात होणाऱ्या जागतिक रोबोटिक स्पर्धेकरिता रवाना झाले आहेत. मनपा पदाधिकाऱ्यांनी या चमूला शुभेच्छा दिल्या.

****

जालना शहर महानगरपालिकेच्या अधिकृत परवानगीशिवाय शहरात बेकायदेशीररित्या होर्डिंग आणि फलक लावणाऱ्या २२ अस्थापनांवर महापालिका प्रशासनानं गुन्हे दाखल केले आहेत. तसेच महापालिकेच्या पथकानं अनेक ठिकाणचे अनधिकृत फलकही जप्त केले आहेत. शहरातल्या आस्थापनांसह नागरिकांनी महापालिकेची रितसर परवानगी घेऊनच होर्डिंग लावावेत अन्यथा बेकायदेशीर लावलेले होर्डिंग, बॅनर जप्त करून संबंधितांवर गुन्हा दाखल करण्यात येईलं, असं महापालिकेचे आयुक्त संतोष खांडेकर यांनी सांगितलं.

****

धुळे जिल्ह्यातील साक्री तालुक्यात दातर्ती गावात बिबट्याने केलेल्या हल्ल्यात एका शेतातील १५ शेळ्या मारल्या गेल्या असून ३ जखमी झाल्या आहेत. दादाजी त्र्यंबक यांच्या शेतातील या शेळ्यांवर बिबट्याने काल मध्यरात्री हल्ला केल्याचे आमच्या वार्ताहरानं सांगितलं. परिसरामध्ये बिबटचा वावर असल्याने रात्री अपरात्री शेतांमध्ये जाताना शेतकऱ्यांनी एकटे दुकटे जाऊ नये. शेतात वास्तव्य असणाऱ्या शेतकऱ्यांनी स्वतःच्या सुरक्षिततेसाठी सजग राहावे तसंच शेतातल्या जनावरांची सुरक्षा वाढवावी असे निर्देश साक्रीचे वनक्षेत्र अधिकारी व्ही.के. खैरनार यांनी दिले आहेत.

****